**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
Email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in

क्र.मासंवि/रवका/न.क्र.१२/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
दुरध्वनी क्रमांक : ०२२- २४०७७४४१
फॅक्स क्रमांक ०२२-२४०२५७६३

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ३६७ दिनांक २९ / ११ / २०११

विषय : **भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सांगली** या रुग्णालयास महावितरण कंपनीच्या मान्यताप्राप्त सूचिवर समाविष्ट करण्याबाबत.

संदर्भ : सा.आ. क्र.२० दि. १७.०६.१९६३.

.....

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील **कर्मचाऱ्यांना** सा.आ.क्र.२० (क) दि.१७.०६.१९६३ (वेळोवेळी सुधारित केलेल्या) मध्ये समावेश असलेल्या गंभीर आजारावरील उपचार/शस्त्रक्रिया कंपनीच्या मान्यताप्राप्त सुचीवरील विविध खाजगी रुग्णालयामध्ये करुन घेतल्यास त्याप्रित्यर्थ होणा-या खर्चाची कंपनीकडून प्रतिपूर्ती मिळण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून सदर सुचीमध्ये भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सांगली या रुग्णालयाचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव महावितरण कंपनीच्या विचाराधीन होता.

२. मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी वैद्यकीय सल्लागार व कार्यकारी संचालक (मा.सं) यांच्याशी विचारविनिमय करुन निम्ननिर्देशित खाजगी रुग्णालयात त्यांच्या नावासमोर रकाना क्र.४ मध्ये नमूद केलेल्या गंभीर आजारावरील उपचार/शस्त्रक्रिया करुन घेता येणे त्या भागातील कर्मचाऱ्यांना सोयीस्कर व्हावे म्हणून सदर रुग्णालय महावितरण कंपनीच्या मान्यताप्राप्त सूचीवर घेण्यासाठी मंजुरी प्रदान केली आहे.

| अ. क्र. | रुग्णालयाचे नाव | पत्ता | उपचारासाठीचे गंभीर/शस्त्रक्रिया करावे लागणारे आजार |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | **भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सांगली** | **भारती विद्यापीठ युनिर्व्हसिटी मेडीकल कॉलेज ॲण्ड हॉस्पिटल, सांगली-४१६४१४** | **१) अस्थिरोग (Orthopadic)<br>२) तीव्र उदर वेदना/शस्त्रक्रिया (Accute Abdominal Diseases/Surgeries<br>३) आंत्रवरोध (Urology)<br>४) मनोविकृती (Neuro)<br>५) भाजणे (Burns)<br>६) छातीचे क्षयरोग (T.B. & Chest)<br>७) निश्चेतनावस्था (Coma)<br>८) वायू कोथ (Gas Gangrene)** |

३. महावितरण कंपनीमधील कर्मचाऱ्यांनी उपरोल्लेखित रुग्णालयात/संस्थेमध्ये रकाना क्र.४ मध्ये दर्शविलेल्या आजारावरील उपचार/शस्त्रक्रिया करून घेतल्यास त्यांना नियमानुसार वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

४. महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी सदरच्या रुग्णालयात संबंधित आजारांसाठी उपचार/शस्त्रक्रिया करुन घेतल्यास रुग्णालयाच्या मूलभूत दर आकारणीच्या (Basic Hospital Charges) १० % सवलत रुग्णालयाकडून मिळेल. तसेच रुग्णालयाने कळविलेली **दरसुची पुढील तीन वर्षासाठी कायम राहील.**

५. सा.आ.क्र.२०(क) दि.१७.०६.१९६३ मधील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या संदर्भातील इतर अटी व तरतूदी अबाधित राहतील.

६. या संदर्भात वरील आजारांवर कर्मचाऱ्यांच्या अवलंबित **कुटुंबियांनी** सदरच्या हॉस्पिटलमध्ये **स्वखर्चाने** उपचार/शस्त्रक्रिया करून घेतल्यास, रुग्णालय मुलभूत दर आकारणीच्या (Basic Hospital Charges) वर १० % सवलत देईल. सदर उपचार/शस्त्रक्रिया कर्मचाऱ्याने अवलंबितासाठी **स्वखर्चाने** करावयाची आहे व त्याचा खर्च परस्पर **रुग्णालयास भरावयाचा** आहे. सदरच्या खर्चास कंपनी जबाबदार राहणार नाही.

७. सदर प्रशासकीय परिपत्रक निर्गमित केलेल्या तारखेपासून अंमलात येईल.

८. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या इंट्रानेटवर उपलब्ध करण्यात आले आहे.

२८/११/२०११

*(विजय भि. बागुल)*
*मुख्य महाव्यवस्थापक (मासं)*

*D:\O&M\Hospitals\Adm.Cir.Dr.Ltr -Bharti Vidyapeeth Hospital, Sangli.doc*